ग्राहक गा-हाणे निवारण मंच
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.
Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172

**No,CGRF/AZ/U / 187 / 2009 / 21 /** **Date :-**

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer ,**
**O&M Urban Circle , M.S.E.D.C.L.,**
**Aurangabad.**

**Sub:- Forwarding of grievance in respect Shri Satishchandra Shrikrishna Khairnar, S.B.Road, Shardamandir Colony, Aurangabad. (Consumer No. New Connection.).**

**Dear Sir,**

**Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Shri Satishchandra Shrikrishna Khairnar, S.B.Road, Shardamandir Colony, Aurangabad.**

**You are requested to submit your para wise reply on the grievance within 15 days from the date of receipt of this letter along with related documents.**

**The hearing in this matter is kept on 03/03/2009 at 11=30 Hrs.**

**Encl: As above**

**Member/Secretary**
**CGRF(AZ) MSEDCL**
**Aurangabad.**

Copy to:-

**Shri Satishchandra**
**Shrikrishna Khairnar, S.B.Road,**
**Shardamandir Colony,**
**Aurangabad..**

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१८७/२००९/२१**

**तक्रार दाखल दिनांक ;- २५/०२/२००९**
**निकाल दिनांक ;- ०८/०४/२००९**

**श्री सतिशचंद्र श्रीकृष्ण खैरनार,**
**एस.बी.रोड,शारदा कॉलनी,**
**औरंगाबाद.**

**अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**शहर विभाग औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडीया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

# आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक २५/०२/२००९ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक ०३/०३/२००९ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराने चेअरमन महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा यांच्याकडुन सी.टी.एस.नंबर ४९८८ पैठणगेट येथील संकुलातील दुकान नंबर ७ व ८ लीज करारावर खरेदी केले आहे या दुकानासाठी नविन वीज पुरवठा देण्यात यावा म्हणुन अर्जदाराने महावितरणच्या औरंगपुरा येथील कार्यालयात योग्य त्या कागदपत्रास अर्ज दाखल केला असल्याचे म्हटले आहे. संबंधित कार्यालयाने अर्जदार वीज पुरवठा मागत असलेल्या जागेवर थकबाकी असल्यामुळे व ही रक्कम भरल्याशिवाय नविन वीज पुरवठा करता येणार नाही असे दिनांक १९/०२/२००९ रोजीच्या पत्राव्दारे कळविले.अर्जदाराने ही रक्कम भरण्यास ते जवाबदार नसल्याचे सांगत महावितरण कंपनीस वीज जोडणी देण्याबाबत आदेश देण्याची विनंती मंचास केली आहे.

२) दिनांक २५/०२/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार श्री खैरनार उपस्थित होते. महावितरणचे नोडल अधिकारी श्री राठौर उपस्थित होते त्यांनी संबंधित विभागाकंडुन कागदपत्रे उपलब्ध न झाल्यामुळे सुनावणीची तारीख पुढे वाढविण्याची विनंती मंचास केली. मंचाने त्यांची विनंती मान्य करीत पुढील सुनावणी दिनांक ०७/०३/२००९ रोजी घेण्याचे ठरविले.

३) दिनांक ०७/०३/२००९ रोजी अर्जदार व नोडल अधिकारी सुनावणीस उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी अर्जदाराच्या वीजेची मागणी करत असलेल्या जागेवर थकबाकी असल्यामुळे नविन वीज जोडणी देता येत

नसल्याचे सांगितले. मंचाने थकबाकी विवरणाबाबत विचारणा केली असता ती पुढील सुनावणीच्या वेळेस दाखल करण्याचे नोडल अधिकारी यांनी मान्य केले. मंचाने याप्रकरणी पुढील सुनावणी दिनांक १७/०३/२००९ रोजी घेण्याची निश्चीत केले.

४) दिनांक १७/०३/२००९ रोजी च्या सनावणीस अर्जदार व नोडल अधिकारी उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी कोणतीही कागदपत्रे मंचाला दाखल केली नाही. मंचाने नोडल अधिकारी यांना आपले म्हणणे दाखल करण्यासाठी शेवटची संधी देत पुढील सुनावणीची तारीख २०/०३/२००९ निश्चीत केली.

५) दिनांक २०/०३/२००९ रोजी अर्जदार व नोडल अधिकारी यांच्यासह शहर विभागाचे कार्यकारी अभियंता श्री खंदारे तसेच कनिष्ठ अभियंता, औरंगपुरा युनिट, उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी मंचात स्थळपाहणी अहवाल व थकबाकी असलेल्या ग्राहकाचे सि.पी.एल. दाखल केले व रुपये ३९६००/- तसेच रुपये २४५०/- अशी दोन ग्राहक क्रमांकाची वीज बिलाची थकबाकी असल्यामुळे नवीन वीज जोडणी देण्यात आली नसल्याचे सांगितले. मंचाने दोन्ही बाजुचे म्हणणे विस्ताराने ऐकल्यानंतर प्रकरण निकासाठी ठेवले.

६) दोन्ही बाजूकडन मंचात दाखल झालेल्या कागदपत्रावरुन व मंचासमोर झालेल्या सुनावणीवरुन असे आढळुन येते की, अर्जदाराने सी.टी.एस. नंबर ४९८८ या क्रमांकावर उभारण्यात आलेल्या संकुलातील दुकान नंबर क्रमांक ७ व ८ लीज करारावर घेतलेले आहेत व त्याची संबंधीत विभागाकडे नोंद देखील करण्यात आलेली आहे.अर्जदाराने ही दुकाने चेअरमन महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा यांच्याकडुन घेतली असुन या नावावर आधी दोन ठिकाणी वीज पुरवठा देण्यात आला असल्याचे दिसुन येते. या दोन ग्राहक क्रमांकावर असलेली थकबाकी खालीलप्रमाणे असल्याचे दिसुन येते.

१) ग्राहक क्रमांक ४९००११६६७७८१ रुपये ३९६००/-
२) ग्राहक क्रमांक ४९००११४८७७०७ रुपये २४५०/-

अर्जदाराने नवीन वीज पुरवठा मिळण्यासाठी अर्ज केल्यानंतर दिनांक १९/०२/२००९ रोजी पत्राव्दारे सदरील जागेवर थकबाकी असल्याचे सांगत ती रक्कम भरल्याशिवाय वीज पुरवठा करता येणार नसल्याचे अर्जदारास कळविण्यात आले. नवीन वीज कायदा २००३ अस्तीत्वात आल्यानंतर महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने वीज पुरवठा अधिनियम २००५ (वीज पुरवठा व संहीता) प्रसीध्द केली ज्याचे पालन करणे महाराष्ट्रातील वीज वितरण करण्या-या सर्व कंपन्याना बंधनकारक आहे.या अधिनियामातील कलम १०.५ हे खालील प्रमाणे आहे.

जर मृत ग्राहक किंवा पुर्वीचा मालक/वहीवाटदार,जसे असेल तसे,यांनी विजेचा आकार किंवा विजेचा आकाराशिवाय अन्य कोणतीही वितरण परवानेधारकास देय असलेली रक्कम अदा करणे बाकी राहीले असेल तर तो बोजा,जागा ज्या कायदेशीर प्रतिनिधी/ कायदेशीर वारस किंवा जागेचा नवीन मालक/वहीवाटदार यांच्या नावे हस्तांतरित झाली असेल,जसे असेल तसे, यांच्यावर राहील आणि अशा कायदेशीर प्रतिनिधी/कायदेशीर वारस किंवा जागेचा नवीन मालक/वहिवाटदार यांच्याकडून वितरण परवनाधारक वसूल करेल.परंतु असे की,कायदेशीर वारसाला जोडणीच्या हस्तांतरणाच्या बाबतीत,विनियम १०.५नुसार येणारा बोजा, जास्तीत जास्त सहा महीने अगोदर पर्यंतच्या कालावधीत फक्त अशा जागेला पुरविण्यात आलेल्या वीजेच्या चुकत्या न केलेल्या आकाराइतकाच मर्यादीत राहील.

महाराष्ट्र वीज नियामक आयोग यांनी केलेल्या वरील अधिनियमानुसार अर्जदाराकडुन महावितरण कंपनीस वीज पुरवठा खंडीत केलेल्या तारखेच्या सहा महिने अगोदरच्या जुन्या ग्राहकाच्या वीज वापराची रक्कम वसुल करता येते.

नोडल अधिकारी यांनी मंचात दाखल केलेल्या सी.पी.एल. ची पाहणी केल्यावर वरील दोन्ही वीज कनेक्शन महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा यांच्या नांवे असल्याचे दिसुन येते. ग्राहक क्रमांक ४९००११६६७७८१ या क्रमांकाच्या

सी.पी.एल.ची पाहणी केल्यावर सदरील ग्राहकांचा वीज पुरवठा हा दिनांक २४/०३/२००६ रोजी कायम स्वरुपी खंडीत करण्यात आला असल्याचे तसेच ग्राहक क्रमांक ४९००११४८७७०७ याचा वीज पुरवठा जुन २००३ मध्ये खंडीत करण्यात आल्याचे दिसुन येते.दोन्ही ग्राहक क्रमांकांचा वीज पुरवठा कायमस्वरुपी बंद करण्यात आला त्यावेळी थकबाकीची रक्कम ही अनुक्रमे ३९३५१.२८ व रुपये २४५०/- अशी असल्याचे दिसुन येते.

ग्राहक क्रमांक ४९००११६६७७८१ यांच्या सी.पी.एल.चे निरिक्षण केल्यावर ऑगस्ट २००५ पर्यंत ग्राहकास मीटर वरील रिडींग प्रमाणे वीज बिल देण्यात येत असल्याचे दिसुन येते. सप्टेबर २००५ मध्ये मागिल रिडींग १७११ व चालु रिडींग २९०२ दाखवत ग्राहकास ११९० युनिट वापराचे वीज बिल देण्यात आले. आक्टोबर २००५ मागिल रिडींग २९०२ व चालु रिडींग १९०३ दाखवत फॉल्टी स्टेटसचे वीज बिल देण्यात आले तर नोव्हेबर २००५ व डिसेंबर २००५ या महीन्यात मागिल व चालु रिडींग १९०३ दाखवत त्यास ११९० युनिट वाज वापराचे सरासरीवर आधारीत बिल आकारण्यात आले असल्याचे दिसुन येते. महावितरण कंपनीतर्फे दाखवण्यात आलल्या पी.डी रिपोर्ट वरुन मार्च २००६ मध्ये मीटर काढण्यात आले तेव्हा मीटरवरील नोंद १९०३ अशी असल्याचे दिसुन येते. यावरुन ऑक्टोबर २००५ पासुन वीज वापर होत नसल्याचे स्पष्ट होते.महावितरणतर्फे सी.पी.एल.मध्ये अर्जदाराच्या नावावर दाखवण्यात आलेली थकबाकी रक्कम चुकीची असल्याचे यावरुन स्पष्ट होते.

सप्टेबर २००५ मध्ये वीज पुरवठा तात्पुरता खंडीत केल्यानंतर असलेल्या थकबाकी रकमेत पुढील सहा महीन्याचा कालावधीचा स्थिर आकार आकारुन एकुण थकबाकी रक्कमेतुन जुन्या ग्राहकाने जमा केलेली सुरक्षा रक्कम वगळुन येणारी रक्कम ही एकुण थकबाकी म्हणुन धरण्यात यावी असे मंचाचे मत आहे. सप्टेंबर २००५ मध्ये सि.पी.एल.वरुन ग्राहकाकडे एकुण थकबाकी १२६०१.०२ थकबाकी असल्याचे स्पष्ट होते. सप्टेबर २००५ मध्ये वीज

पुरवठा खंडीत केल्यानंतर पुढील ६ महिन्याचा एकुण स्थिर आकार (६× १००=६००) लक्षात घेता एकुण थकबाकी रक्कम ही रुपये १३२०१.०२/- अशी येते. या थकबाकीतुन ग्राहकांने सुरक्षा रक्कम म्हणुन भरलेली रुपये १०,०००/-रक्कम वजा करता ग्राहकाकडे एकुण थकबाकी रुपये ३२०१.०२/अशी असल्याचे स्पष्ट होते.

त्याचप्रमाणे ग्राहक क्रमांक ४९००११४८७७०७ च्या सि.पी.एल.चे निरिक्षण केल्यानंतर नोडल अधिकारी यांनी दाखल केलेल्या जवाबानुसार जुन २००३ मध्ये ग्राहकाचा वीज पुरवठा खंडीत करण्यात आल्याचे म्हटले आहे.वरील कनेक्शनवरील अनामत रक्कम रुपये १०,०००/-वजा केल्यानंतर एकुण थकबाकी रक्कम २४४७.५९ अशी असल्याचे दिसुन येते. सदरील सुनावणी दरम्यान महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा यांना त्याच संकुलात वीज पुरवठा देण्यात आला असल्याचे नोडल अधिकारी यांनी सांगितले. त्याचा ग्राहक क्रमांक ४९००१००४३९९६ असा आहे.

मा.विद्युत ओम्बडसमन यांनी अशाच एका प्रकारणात (केश नंबर ७८/०८) मध्ये थकबाकी असलेल्या ग्राहकाकडुन त्याच इमारतीत वीज वापराचे दुसरे कनेक्शन असल्यास थकबाकी रक्कम वसुल करता येते असे म्हटले आहे. वरील सर्व बाबीचे निरिक्षण केल्यावर अर्जदार हे जुनी थकबाकी रक्कम भरण्यास जवाबदार नसल्याचे मंचाचे मत आहे.

मंच या प्रकरणी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) अर्जदाराची तक्रार मान्य करण्यात येत असुन महावितरण कंपनीने अर्जदाररचा नवीन वीज पुरवठ्या बाबतचा अर्ज स्विकारावा व महाराष्ट्र वीज आयोगाने नवीन वीज पुरवठा देण्याबाबत तयार केलेल्या कृती मानका प्रमाणे अर्जदारास वीज पुरवठा करावा.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **प्र. अ. सगणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१८७/२००९/२१** **दिनांक ;-**

**प्रति,**
**श्री सतिशचंद्रा श्रीकृष्णा खैरनार,**
**एस.बी.रोड,शारदा कॉलनी,**
**औरंगाबाद.**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१८७/२००९/२१ )

आपण दिनांक २५/०२/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**प्रती, सविनय सादर,**
**मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय,**
**म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.**

**प्रती,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद**
**माहिती व उचीत कारवाही करीता**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**